Maharashtra Election Watch

ADR
Association for Democratic Reforms

**२२ ऑगस्ट, २०१६**

**प्रसिद्धी पत्रक**

# कल्याण व नंदुरबार तालुका ग्रामपंचायत निवडणुका, महाराष्ट्र २०१६

## उमेदवारांचे गुन्हेगारी, आर्थिक, शैक्षणिक, लिंग आणि इतर पार्श्वभूमीचे विश्लेषण


असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स

टी-९५ए, सी.एल.हाऊस, १ला मजला,

गुलमोहर कमर्शियल कॉम्प्लेक्सजवळ

गौतम नगर,

नवी दिल्ली-११० ०४९

फोन:+९१-०११-४१६५-४२००

फॅक्स:+९१-११-४६०९-४२४८

इमेल:adr@adrindia.org


निवडणुकीदरम्यान आचरसंहितेच्या कुठल्याही उल्लंघनाची आणि गैरव्यवहाराची सूचना देण्यासाठी इलेक्शन वॉच रिपोर्टर डाऊनलोड करा (अँड्रॉईड ऍप)

https://play.google.com/store/apps/details?id=com.webrosoft.election_watch_reporter

# संक्षेप आणि ठळक मुद्दे

**असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म्स (एडीआर)** आणि **महाराष्ट्र इलेक्शन वॉच** यांनी ठाणे जिल्ह्यातील कल्याण तालुक्यात आणि नंदुरबार जिल्ह्यातील नंदुरबार तालुक्यात येत्या २४ ऑगस्ट २०१६ रोजी होऊ घातलेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत भाग घेत असलेल्या ६७ उमेदवारांच्या घोषणा पत्र प्रतिनिधिक स्वरूपात विश्लेषण केलं आहे. **नाशिक, पुणे, लातूर, नांदेड, चंद्रपूर यांसारख्या अन्य तालुक्यांतील प्रतिनिधींची घोषणा पत्र उपलब्ध न होऊ शकल्याने त्यांचं विश्लेषण होऊ शकलं नाही.**

कल्याण तालुक्यात एकूण ६ ग्रामपंचायतीच्या १८ प्रभाग तून एकूण ४४ जागा आहेत ज्यापैकी ४ (९%) जागांसाठी कोणत्याही उमेदवाराने आपली उमेदवारी दर्शवली नाही. कल्याण तालुक्यातील ३७ (८४%) उमेदवार हे बिनविरोध निवडून येणार आहेत. रुंदे आणि केळणी कोलम मध्ये फक्त २ प्रभागातील ३ (७%) जागांसाठीच निवडणुका होत आहेत.

नंदुरबार तालुक्यातील ३८ ग्रामपंचायतींपैकी एडीआरने फक्त कळंबा आणि खोडसगाव या २ ग्रामपंचायतीतील उमेदवारांच्या घोषणा पत्रांचे विश्लेषण केलं आहे. ६ प्रभागातील १४ जागांसाठी होणा-या या निवडणुकांमध्ये १ जागेसाठी असलेल्या उमेदवारांची घोषणा पत्र मिळू शकली नाहीत.

## गुन्हेगारी पार्श्वभूमी

- **गुन्हेगारी प्रकरणं असलेले उमेदवार:** वरील ६७ उमेदवारांपैकी कुणीही त्यांच्यावर कसल्याही प्रकारच्या गुन्हेगारी प्रकरण असल्याचे घोषित केले नाही.

## आर्थिक पार्श्वभूमी

- **लक्षाधीश उमेदवार**: विश्लेषित ६७ उमेदवारांपैकी १५ (२२%) उमेदवार लक्षाधीश आहेत.

- **प्रचंड मालमत्ता असलेले पहिले ५ उमेदवार :** *प्रचंड मालमत्ता असलेले पहिले ५ उमेदवार खालील प्रमाणे आहेत–*

| S.No. | Name | District | Constituency | Movable Assets (Rs) | Immovable Assets (Rs) | Total Assets (Rs) | PAN Given |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nitin Pandharinath Desle | THANE | KALYAN TALUKA - RUNDHE AMBIVALI (WARD NO :3C) | 3,88,220* | 93,00,000* | 96,88,220 96 Lacs+ | N |
| 2 | Santosh Murlidhar Bharne | THANE | KALYAN TALUKA - MAMNOLI (WARD NO :3C) | 2,05,000* | 39,00,000* | 41,05,000 41 Lacs+ | N |
| 3 | Preeti Ramesh Shelar | THANE | KALYAN TALUKA - KOLIMB KELNI (WARD NO :1A) | 7,95,000* | 30,00,000* | 37,95,000 37 Lacs+ | Y |
| 4 | Yogita Jagan Bhor | THANE | KALYAN TALUKA - MAMNOLI (WARD NO :2B) | 2,66,989* | 25,00,000* | 27,66,989 27 Lacs+ | N |
| 5 | Sujata Ramdas Chaudhary | THANE | KALYAN TALUKA - RUNDHE AMBIVALI | 3,05,000* | 23,00,000* | 26,05,000 26 Lacs+ | N |

| S.No. | Name | District | Constituency | Movable Assets (Rs) | Immovable Assets (Rs) | Total Assets (Rs) | PAN Given |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | (WARD NO :2B) | | | | |

**Table 1 : Top 5 high asset candidates**

- **<u>सरासरी मालमत्ता</u>**: ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये भाग घेणा-या आणि विश्लेषण केलेल्या उमेदवारांची सरासरी मालमत्ता रु ७.६९ लाख इतकी आहे.

- **<u>शून्य मालमत्ता</u>**: एकूण १४ (२१%) उमेदवारांनी शून्य मालमत्ता असल्याचे घोषित केले आहे आणि ते सर्व नंदुरबार तालुक्यातील आहेत.

- **<u>कमी मालमत्ता</u>**: शून्य मालमत्ता घोषित करणारे वरील उमेदवारांना सोडून, इतर एकूण २८ (४२%) उमेदवारांनी रु.५ लाखांपेक्षा कमी कमी मालमत्ता असल्याचे घोषित केले आहे..

- ***<u>जास्त देणी असलेले उमेदवार:</u>*** ६७ पैकी २ (३%) उमेदवारांनी रु.५ लाखांपेक्षा जास्त देणी असल्याचे घोषित केले आहे. त्यांच्या देण्यांची माहिती खालील प्रमाणे आहे:-

| S.No. | Name | District | Constituency | Total Assets(Rs) | Liabilities (Rs) | PAN Given |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Ganesh Keshav Chaudhary | THANE | KALYAN TALUKA - RUNDHE AMBIVALI (WARD NO :3C) | 9,14,200<br>9 Lacs+ | 5,55,000*<br>5 Lacs+ | Y |
| 2 | Balkrishna Pandurang Bhere | THANE | KALYAN TALUKA - DAHIVALI ADIVALI (WARD NO :3C) | 17,63,500<br>17 Lacs+ | 5,25,000*<br>5 Lacs+ | N |

**Table 2: Candidates with declared liabilities**

- ***<u>शून्य देणी असलेले उमेदवार:</u>*** ६७ पैकी ५८ (८७%) उमेदवारांनी शून्य देणी असल्याचे घोषित केले आहे.

- **<u>पॅन घोषित न केलेले उमेदवार</u>**: ६७ पैकी ६३ (९४%) उमेदवारांनी त्यांचा पॅन घोषित केलेला नाही.


- **<u>आय कराची माहिती घोषित न केलेले उमेदवार:</u>** ६७ पैकी ६५ (९७%) उमेदवारांनी त्यांच्या आय कराची माहिती घोषित केलेली नाही.

## इतर पार्श्वभूमीची माहिती

- ***<u>उमेदवारांची शैक्षणिक माहिती:</u>*** ५ (७%) उमेदवार निरक्षर आहेत, ५ (७%) उमेदवार साक्षर आहेत, २८ (४२%) उमेदवारांनी त्यांचे शिक्षण १० वी पास किंवा त्यापेक्षा कमी नमूद केले आहे, २ (३%) उमेदवारांनी त्यांचे शिक्षण १२ वी पास दाखवले आहे, २ (३%) उमेदवारांनी त्यांचे शिक्षण पदवी आणि त्यापेक्षा जास्त सांगितले आहे. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, सर्वोच्च म्हणजे २४ (३६%) उमेदवारांनी त्यांच्याबद्दल कसलीही शैक्षणिक माहिती नमूद केलेली नाही.

| Education Group | Number of Candidates analyzed |
|---|---|
| Illiterate | 5 |
| Literate | 5 |
| 5th Pass | 3 |
| 8th Pass | 18 |
| 10th Pass | 7 |
| 12th Pass | 2 |
| Graduate | 1 |
| Post Graduate | 1 |
| Others | 1 |
| Not Given | 24 |
| Total | 67 |

**Table 3: Education Report**




## Overall Education Report

- <u>**उमेदवारांच्या वयाची माहिती:**</u> ५ (७%) उमेदवारांनी त्यांचे वय २१ ते २४ वर्ष असल्याचे घोषित केले आहे, १४ (२१%) उमेदवारांनी त्यांचे वय २५ ते ३० वर्षे असल्याचे सांगितले आहे, २५ (३७%) उमेदवारांनी त्यांचे वय ३१ ते ४० वर्षे असल्याचे नमूद केले आहे, १३ (१९%) उमेदवारांनी त्यांचे वय ४१ ते ५० वर्षे असल्याचे सांगितले आहे आणि १० (१५%) उमेदवारांनी त्यांचे वय ५१ ते ६० असल्याचे सांगितले आहे.

| Age Group (In Years) | Number of Candidates Analyzed |
|---|---|
| 21-24 | 5 |
| 25-30 | 14 |
| 31-40 | 25 |
| 41-50 | 13 |
| 51-60 | 10 |
| **Total** | **67** |

**Table 4: Age Report**

- **<u>उमेदवारांची लिंगविषयक माहिती</u>**: या निवडणुकीत भाग घेणा-यांपैकी २९ (४३%) उमेदवार पुरूष आहेत तर ३८ (५७%) उमेदवार महिला आहेत.

| S.No. | Total candidates analyzed | Men | Women |
|---|---|---|---|
| 1 | 67 | 29 | 38 |
| **Total** | **67** | **29** | **38** |

**Table 5: Gender Report**

# संपर्क

## महाराष्ट्र इलेक्शन वॉच


| **अजित रानाडे**<br>संस्थापक सदस्य,<br>नॅशनल इलेक्शन वॉच,<br>असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स.<br>+९१-९७०२२-१५३१२<br>ajit.ranade@gmail.com | **शरद कुमार**<br>राज्य समन्वयक<br>महाराष्ट्र इलेक्शन वॉच<br><br>+९१-९८६९-४०३७२१<br>sharadkumar40@gmail.com | **दीपक नेगी**<br>**वरिष्ठ कार्यकारी सहाय्यक**<br>असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स<br>+९१-९८९२४०३१८६<br>deepak@adrindia.org |
|---|---|---|


## नॅशनल इलेक्शन वॉच/असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स


| मिडीया आणि पत्रकारांसाठी हेल्पलाईन<br><br>+९१ ८०१०३ ९४२४८<br>ईमेल:adr@adrindia.org | मे.जन.अनिल वर्मा (सेवानिवृत्त)<br>प्रमुख<br>नॅशनल ईलेक्शन वॉच, असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स<br>०११ ४१६५ ४२००<br>+९१ ८८२६४ ७९९१०<br>adr@adrIndia.org, anilverma@adrindia.org | प्रा. जगदीप चोक्कार<br>आयआयएम अहमदाबाद (सेवानिवृत्त)<br>संस्थापक सदस्य, नॅशनल ईलेक्शन वॉच, असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स<br>+९१ ९९९९६ २०९४४<br>jchhokar@gmail.com | प्रा. त्रिलोचन शास्त्री<br>आयआयएम बँगलोर<br>संस्थापक सदस्य, नॅशनल ईलेक्शन वॉच, असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स<br>+९१ ९४४८३ ५३२८५<br>trilochans@iimb.ernet.in |
|---|---|---|---|


# डिसक्लेमर

उमेदवारांबद्दल या अहवालात दिलेली सगळी माहिती ही त्यांनी राज्य निवडणूक आयोग (एसइसी), महाराष्ट्र यांच्या निवडणुक अधिकारी ला सादर केलेल्या घोषणा पत्रातून घेतलेली आहे. **राज्य निवडणूक आयोगाने माहितीमध्ये काही बदल केल्याशिवाय एडीआर उपरोक्त माहितीमध्ये कसलेही कमी-अधिक बदल करत नाही. विशेष करून इतर कुठल्याही स्त्रोताकडून मिळालेली अप्रमाणित माहिती अजिबात वापरली जात नाही.** . सगळी माहिती निवडणूकीतील घोषणापत्रा बरहुकूम ठेवली जावी यासाठी जरी सर्वतोपरी प्रयत्न केले असले तरी या अहवालातील माहिती आणि निवडणुकीतील उमेदवारांनी सादर केलेली घोषणापत्र यांमधील माहितीमध्ये काही विसंगती आढळल्यास घोषणापत्रांतील माहिती बरोबर मानावी. प्रकाशनाच्या प्रक्रियेदरम्यान या अहवालामध्ये काही दोष निर्माण झाल्यास त्यासाठी असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स, महाराष्ट्र ईलेक्शन वॉच आणि त्यांचे स्वयंसेवक कुठल्याही प्रकारे जबाबदार असणार नाहीत.